# N -LIST — E - RESOURCES

**प्रा. डी. एन. काळे**
ग्रंथपाल
शिक्षणशास्त्र महाविदयालय, नाशिक

**प्रस्तावना :**

आज २१ व्या शतकामध्ये माहितीचा प्रचंड प्रस्फोट झालेला आहे. त्यामुळे ज्ञानाच्या इतक्या शाखांची निर्मिती झाली आहे की या सर्व शाखांना सामावून घेण्याची क्षमता फक्त ग्रंथालयातच आहे. एका पिढीने मिळवलेले ज्ञान येणाऱ्या नवीन पिढीसाठी उपलब्ध करुन देण्याचे काम ग्रंथालये करीत आहेत. यालाच संस्कृती संवर्धन असे म्हटले जाते. आजची जी ग्रंथालये आहेत, या ग्रंथालयांनी ग्रंथ, नियतकालिके, हस्तलिखिते, मायक्रोफिल्म,मायक्रोफिश, सीडीज, संगणकीय डेटाबेसपासून वेब आधारित, इंटरनेट आधारीत डेटाबेस पर्यंत वाचन साहित्य संग्रहीत करुन ठेवलेले आहे. याचा अर्थ असा की मानवाचे विचार व अनुभव ज्या ज्या स्वरुपात संग्रहीत करुन ठेवणे शक्य आहे ते ते सर्व काही आजच्या ग्रंथालयांनी केले आहे.

डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ग्रंथालयाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. " Library is trinity of Book,Reader & staff ", म्हणजेच ग्रंथालयाचे ग्रंथ, वाचक आणि ग्रंथालयीन सेवक हे तीन घटक एकत्र आल्याशिवाय ग्रंथालयाची व्याख्या परिपूर्ण होत नाही.

ग्रंथालयाचे जे पाच सिध्दांत आहे. त्याच सिध्दांतावर ग्रंथालये उभी आहेत ती म्हणजे,

१) ग्रंथ हे वाचनासाठी आहेत.
२) प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे.
३) प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळाला पाहिजे.
४) वाचकांचा वेळ वाचविला पाहिजे. आणि
५) ग्रंथालय ही वर्धिष्णु संस्था आहे.

या ठिकाणी सिध्दांत ४ चा विचार करता – मॅकॉल्विन या लेखकाने असे म्हटले आहे की – "Right Book for the right Reader at the Right Time". ग्रंथ, वाचक आणि वेळ या तीन घटकांमध्ये सर्वात अर्थपूर्ण घटक आहे "वेळ". माहिती किंवा माहितीसाधन वाचकाला वेळेवर उपलब्ध नसेल आणि गरज संपल्यावर उपलब्ध होणार असेल तर वाचकाला त्या माहितीचे महत्त्व वाटणार नाही. म्हणून यालाच ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या भाषेत "Information delayed in Information denied" असे म्हटले जाते.

पाचवा जो सिध्दांत आहे तो म्हणजे "Library is growing organism" याचा अर्थ असा की वाचन साहित्यामध्ये दरवर्षी वाढ होत असते. आणि हा वाढणारा संग्रह ठेवण्यासाठी जागा लागते. जागा तेवढीच पण

ग्रंथसंग्रह वाढणारा यामुळे ग्रंथालयांसमोर space problem (जागेची कमतरता) निर्माण झाली आणि यातून मार्ग काढण्यासाठी ग्रंथालये ही पारंपारिक संग्रहाबरोबरच Electronic स्वरुपातील वाचन साहित्याचाही संग्रह करु लागली आणि त्यामुळे पारंपारिक ग्रंथालयांचे रुपांतर Hybrid library मध्ये झाले आणि त्यानंतर Digital library, Virtual library, paperless library या संकल्पना पुढे येवू लागल्या आहेत. आणि म्हणून ग्रंथ नियतकालिके यांचे प्रकाशक देखील आपले वाचन साहित्य प्रिंट (छापील) स्वरुपाऐवजी इलेक्ट्रॉनिक स्वरुपात प्रकाशित करु लागली. त्यामुळे ई-स्वरुपातील वाचन साहित्य इंटरनेटच्या माध्यमातून ग्रंथालयांना उपलब्ध करुन देणे सहज शक्य झाले आहे.

जसे समाजाच्या बदलास आधुनिक तंत्रज्ञान कारणीभूत ठरले तसे ग्रंथालयाच्या बदलास माहिती तंत्रज्ञान कारणीभूत ठरले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे ग्रंथालयाची माहितीशाखा विकसित होण्यास पुढील प्रमाणे घटक कारणीभूत ठरले आहेत.

१) प्राथमिक माहितीच्या निर्मितीत झालेली लक्षणीय वाढ.

२) ज्ञानाच्या शाखांमध्ये झालेली वाढ.

३) उपलब्ध माहितीचे विखुरलेपण.
(जसे ग्रंथालयशास्त्राशी संबंधित माहिती ग्रंथालयशास्त्राच्या पुस्तकातच मिळेल असे नाही तर ती शिक्षणशास्त्र, संगणकशास्त्र, व्यवस्थापन अशा इतरही विषयांच्या पुस्तकात मिळू शकेल.)

४) माहिती त्वरीत उपलब्ध करुन देण्याविषयी वाचकांची वाढती मागणी.

**ई-प्रकाशने म्हणजे काय? – ( E-Publications)**

F.W. लॅंकेस्टर यांच्या मते – " E-Publication is a process where the manuscripts are submitted in format, edited printed & even distributed to users in e-form by computer & communication technology".

"छापील माहितीचे रुपांतर इलेक्ट्रॉनिक स्वरुपात करुन संगणक व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाचकांना वितरीत करणे म्हणजे ई - प्रकाशने होय".

**ई-प्रकाशनाचे गुणविशेष :**

१. माहितीत सुलभतेने, त्वरीत सुधारणा करता येतात.

२. माहिती वाचकांपर्यंत पोहोचण्यास वेळ लागत नाही.

३. स्थल - काल मर्यादा नाही. जगातील कोणत्याही ठिकाणाहून दिवसाच्या कोणत्याही वेळेत इंटरनेटच्या सहाय्याने ई - प्रकाशने वाचता येतात.

४. गहाळ होण्याची, हरवण्याची, हाताळून खराब होण्याची शक्यता नसते.

५. ग्रंथालयात संग्रह करावा लागत नाही.

६. Hyper links मुळे इतर संग्रहांना जोडता येतात.

७. वाचनीय मजकूराबरोबरच Multimedia सुविधा उपलब्ध.

**ई-प्रकाशनाचे स्वरुप :**

E-Books, Print on Demand, Digital content, E-mail Publishing, Web Publishing & E-Journals.

**INFLIBENT :**

Inflibnet म्हणजे Information & Library Network होय. Inflibent ची स्थापना 1991 मध्ये UGC च्या सहकार्याने अहमदाबाद येथे झाली.

देशातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन व विकास संस्था व इतर महत्वाच्या संस्थांची ग्रंथालये एकमेकांना जोडण्याचा एक महत्वपूर्ण प्रकल्प UGC ने हाती घेतला आहे. त्यालाच INFLIBNET असे म्हणतात.

**INFLIBNET ची उद्दिष्टये :**

१) देशात ग्रंथालये आणि माहिती केंद्राचे जाळे (Network) प्रस्थापित करणे.

२) Online सेवा देणे. (माहिती सेवा देणे)

३) Union Catalogue तयार करणे.

४) विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालयांचे संगणकीकरण करणे व त्यात एकजिनशीपणा आणून त्यासाठी मानके तयार करणे.

५) आंतरराष्ट्रीय डेटाबेस Online तत्वावर उपलब्ध करुन देणे.

६) N-LIST च्या माध्यमातून आधुनिक वाचन साहित्य शिक्षक, विदयार्थी संशोधक यांच्यापर्यंत पोहोचवणे.

**About N-LIST :**

National Library & Information Services Infrastructure for scholarly content.

हा प्रकल्प UGC-Infonet Digital Library Consortia and INDEST-AICTE Consortia IIT नवी दिल्ली या दोन कन्सोरशियांच्या एकत्रित प्रयत्नांनी कार्यान्वीत झालेला आहे. तत्कालीन केंद्रीयमंत्री, कपिल सिब्बल, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या हस्ते शास्त्री भवन, नवी दिल्ली येथे ४ मे २०१० रोजी N-LIST ची स्थापना झाली.

**How to Join :**

1. UGC कायदयातील कलम 12B/2F अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांना यात सहभागी होता येते.
2. त्यासाठी Annual membership fee Rs. 5000/- आहे.

3. (a) नोंदणी Online पध्दतीने करावी लागते. यामध्ये महाविद्यालयाची माहिती, विदयार्थी संख्या, महाविदयालय कोणत्या विद्यापीठाशी संलग्न आहे, NACC, approval number, date, validity period, grade ही माहिती दयावी लागते.

(b) महाविद्यालयात Intranet/Internet Infrastructure आहे काय – यामध्ये LAN, Internet Connectivity Static IP Address तसेच Service Provider कोण आहे ही माहिती दयावी लागते.

(c) ग्रंथालयाचे संगणकीकरण झालेले आहे काय? त्यासाठी कोणते Software वापरात आहे.

(d) महाविद्यालयाचा E-mail Address दयावा लागतो.

(e) त्याचप्रमाणे महाविद्यालयातील Faculty members, staff, students यांचे E-mail Address स्वतंत्र form मध्ये भरुन त्यांची यादी N-LIST Centre कडे पाठवावी लागते.

एवढी सर्व पुर्तता केल्यानंतर ८-१० दिवसात प्रत्येकाला स्वतंत्र Password दिला जातो. ही सर्व माहिती E-mail च्या सहाय्याने पाठविली जाते. त्यांच्याकडून कोणताही लेखी पत्रव्यवहार केला जात नाही.

**Beneficiary Institutions :**

तीन प्रकारच्या संस्थेतील वाचकांना N-LIST चा उपयोग होतो त्या म्हणजे,

१) UGC INFONET Digital Library Consortium अंतर्गत Phase I आणि Phase II मध्ये असलेली विद्यापीठे. (१०० विद्यापीठे आहेत)

२) भारतातील IIT, Indian Institute of Science, IISER आणि निवडक NIT या संस्थेतील वाचक (३४ संस्था यात आहेत) आणि

३) UGC च्या 12B/2F कलमांतर्गत मान्यताप्राप्त शासकीय किंवा शासकीय अनुदानित महाविद्यालये Electronics वाचन साहित्याचा लाभ घेतात.

**Electronics Resources :**

यामध्ये USA, UK व India मधील 11 प्रकाशकांच्या 3800 पेक्षा जास्त E-Journals चा Database उपलब्ध आहे तर 10 प्रकाशकांच्या 80000 पेक्षा जास्त E-Books चा Database उपलब्ध आहे.

**How to access Resources :**

इंटरनेट Open केल्यानंतर http://nlist.inflibnet.ac या वेबसाईटच्या सहाय्याने E-Resources पाहता येतात. Members login मध्ये username व password Enter केल्यानंतर अधिकृत प्रकाशकांची यादी व त्यांच्या वेबसाईची यादी त्या ठिकाणी दिसते. त्यामुळे users ला हव्या असलेल्या माहितीचा शोध घेता येतो. "search" option वर click केल्यानंतर आपल्याला हव्या असलेल्या Journals/Books किंवा Subject चे नाव यानुसार माहितीचा शोध घेता येतो.

**Infrastructure Reguired at colleges :**

E-Resources पाहण्यासाठी संगणक, इंटरनेट इत्यादी सुविधा महाविद्यालयाने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**Current Status :**

आतापर्यंत 3386 महाविद्यालयांनी नोंदणी केलेली असून यामध्ये 3082 शासकीय व शासकीय अनुदानित महाविद्यालयांचा सामावेश आहे.

वाचन साहित्याचे बदलते स्वरुप व माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयातील वाढता प्रभाव यामुळे वाचकांना माहिती तंत्रज्ञानावर आधारीत सेवा पुरविणे तसेच Electronic माध्यमातील वाचन साहित्य उपलब्ध करुन देणे आता सहज शक्य झाले आहे.

महाविदयालयीन ग्रंथालयांना आर्थिकदृष्टया परवडणारा N-LIST प्रकल्प INFLIBNET ने कार्यान्वित केल्यामुळे महाविदयालयीन ग्रंथालयाच्या वाचकांची सोय झालेली आहे. या संधीचा फायदा प्राध्यापकांनी घ्यावा असे आवाहन ग्रंथपाल म्हणून करतो. या प्रकल्पाला आपण Digital Library असेही म्हणू शकतो.

Digital Library विचार करतांना आपण जी माहिती इतरांनी Digital स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली आहे. ती संगणक व संप्रेषण तंत्रज्ञान वापरुन आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देणे किंवा आपल्या ग्रंथालयातील जे वाचन साहित्य आहे त्याचे Digitization करुन आपल्या वाचकांना उपलब्ध करुन देणे.

**E- Journals :**

1. Cambridge Books Online (1800 titles) http://ebooks.cambridge.org
2. E-brary (83000+ titles) http://site.ebrary.com/lib/inflibnet
3. EBSCoHost-Net Library (936 titles) http://www.netlibrary.com/
4. Hindustan Book Agency (65+ titles) http://hindustan.igpublish.com
5. Institute of South East Asian Studies(ISEAS) Books (382+ titles) http://iseas.igpublish.com
6. Oxford Scholarship (1402+ titles) http://www.oxfordscholarship.com/
7. Springer eBooks (2300 titles) http://www.springerlink.com.
8. Sage Publication eBooks (1000 titles) http://knowledge.segepub.com.
9. Taylor Francis eBooks (1800 titles) http://www.tandfebooks.com.
10. Myilibrary-McGraw Hill (1124 titles) http://lib.myilibrary.com/

**E-Books :**

| | | |
|---|---|---|
| 1. | Cambridge Books Online (1800 titles) | http://ebooks.cambridge.org |
| 2. | E-brary (83000+ titles) | http://site.ebrary.com/lib/inflibnet |
| 3. | EBSCoHost-Net Library (936 titles) | http://www.netlibrary.com/ |
| 4. | Hindustan Book Agency (65+ titles) | http://hindustan.igpublish.com |
| 5. | Institute of South East Asian Studies(ISEAS) Books (382+ titles) | http://iseas.igpublish.com |
| 6. | Oxford Scholarship (1402+ titles) | http://www.oxfordscholarship.com/ |
| 7. | Springer eBooks (2300 titles) | http://www.springerlink.com. |
| 8. | Sage Publication eBooks (1000 titles) | http://knowledge.segepub.com. |
| 9. | Taylor Francis eBooks (1800 titles) | http://www.tandfebooks.com. |
| 10. | Myilibrary-McGraw Hill (1124 titles) | http://lib.myilibrary.com/ |